प्रादेशिक हवामान पूर्वानुमान केंद्र, मुंबई आणि डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठ, दापोली

हवामानावर आधारीत कृषि सल्ला (रत्नागिरी जिल्हा)

(०२३५८) २८२३८७

अंक ३१/२०१८ दिनांक १७/०४/२०१८ कालावधी ५ दिवस



| डॉ. सुभाष चव्हाण, | डॉ. विजय मोरे, | प्रा. विरेश चव्हाण, |
|---|---|---|
| विभाग प्रमुख, | नोडल ऑफिसर, | तांत्रिक अधिकारी, |
| कृषिविद्या विभाग | कृषिविद्या विभाग | कृषिविद्या विभाग |
| ९४२२४३१०६७ | ९४२२३७४००१ | ९४२२०६५३४४ |


| मागील हवामान सारांश दि. १३/०४/२०१८ ते १७/०४/२०१८ | | |
|---|---|---|
| पाऊस (मिमी) | : | ०.० |
| पाऊस (मिमी) १/१/१८ पासून | : | ०.० |
| पाऊस (मिमी) (गेल्या वर्षी) | : | ३६३३.५ |
| कमाल तापमान (अं.से) | : | ३२.५–३६.१ |
| किमान तापमान (अं.से) | : | २०.७–२४.० |
| सकाळची सापेक्ष आर्द्रता (:) | : | ९०–९७ |
| दुपारची सापेक्ष आर्द्रता (:) | : | ६४–६७ |
| वाऱ्याचा वेग (किमी/तास) | : | ३.९–६.० |

**हवामान पूर्वानुमान (१८/०४/२०१८ सकाळी ८:३० पासून २२/०४/२०१८ सकाळी ८:३० वाजेपर्यंत)**

| हवामांनाचे घटक | : | १८/०४ | १९/०४ | २०/०४ | २१/०४ | २२/०४ |
|---|---|---|---|---|---|---|
| पाऊस (मिमी) | : | ० | ० | ० | ० | ० |
| कमाल तापमान (अं.से) | : | ३५ | ३५ | ३५ | ३५ | ३६ |
| किमान तापमान (अं.से) | : | २७ | २५ | २६ | २५ | २६ |
| मेघाच्छादन (ऑक्टा) | : | ३ | ४ | ३ | ३ | १ |
| सकाळची सापेक्ष आर्द्रता (:) | : | ९२ | ८९ | ७६ | ७४ | ५९ |
| दुपारची सापेक्ष आर्द्रता (:) | : | ४४ | ४५ | ३५ | ३६ | ३३ |
| वाऱ्याचा वेग (किमी/तास) | : | ००३ | ००४ | ००८ | ०११ | ०११ |
| वाऱ्याची दिशा | : | नै.प. | नै.द. | नै.द. | नै.द. | नै.प. |

## :हवामान पूर्वानुमान कृषि सल्ला:

**दिनांक १८ ते २२ एप्रिल २०१८ पर्यत अवकाश अंशत: मेघाच्छादित राहिल. दिनांक १८ ते २२ एप्रिल, २०१८ पर्यत वाऱ्याचा वेग ३ ते ११ किमी प्रति तास राहिल. आहे.**

| पिक | पिक अवस्था | कृषि सल्ला |
|---|---|---|
| भुईमूग | शेंगा धरणे | • बाष्पीभवनामध्ये वाढ होत असल्याने भुईमूग पिकाला ६ ते ८ दिवसांच्या अंतराने पाणी द्यावे. |
| कडधान्य पिके | काढणी | • तयार झालेल्या कडधान्य पिकांची सकाळी आणि संध्याकाळी काढणी करून उन्हात व्यवस्थित वाळवावे. वाळलेली पिकांची संरक्षित ठिकाणी साठवण करावी. |
| आंबा, काजू | फळधारणा आणि फळे काढणी | • फळधारणा झालेल्या आंबा झाडास उपलब्धतेनुसार शक्य आहे तिथे प्रति झाडास १० दिवसांच्या अंतराने १५० ते २०० लिटर पाणी द्यावे.<br>• आंबा फळांवर फळमाशीचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता आहे, फळमाशीच्या नियंत्रणासाठी आंबा बागेत विद्यापीठाने शिफारस केलेले हेक्टरी ४ या प्रमाणात रक्षक फळमाशी सापळे लावावेत.<br>• आंब्यामध्ये मोठया आकाराची काढणीची फळे तयार झाली असून ती काढणीच्या अवस्थेत आहेत. तयार फळे सकाळी दहाच्या अगोदर व दुपारी चारच्या नंतर झेल्याच्या सहाय्यान ८० ते ८५ टक्के पक्वतेला काढावीत. काढलेली फळे साका टाळण्यासाठी व उष्णतेपासून बचाव करण्यासाठी सावलीत ठेवावीत.<br>• काढणी पश्चात बुरशीजन्य रोगापासून आंबा फळांचे संरक्षण करण्यासाठी काढणीनंतर लगेचच फळे ५ ग्रॅम कार्बेन्डॅझिम १० लिटर पाणी या द्रावणात १० मिनिटे बुडवावीत आणि नंतर सावलीत वाळवावीत. काढलेली तयार फळे पिकवण्यासाठी ती ६.५ मि.ली इथ्रेल १० लिटर पाणी या द्रावणात ५ मिनिटे बुडवून नंतर सावलीत वाळवावीत. डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठानी शिफारस केलेले कोरोगोटेड फायबर बॉक्सच्या सहाय्याने आंब फळांची पॅकिंग करावी. शक्यतो आंब्याची वाहतूक रात्रीच्यावेळी करावी. फळे काढणीच्या किमान ८ दिवस अगोदर झाडावर कोणतेही औषध फवारू नये.<br>• काजू झाडावरील रोठा या किडीच्या नियंत्रणासाठी रोठयाच्या अळया १५ मि. मी. आकाराच्या पटाशीच्या सहाय्याने काढून टाकाव्यात व क्लोरोपायरीफॉस (२० टक्के प्रवाही) १० मि. लि. प्रति लिटर या प्रमाणात द्रावण तयार करून प्रादुर्भित भाग त्या द्रावणाने चांगला भिजवावा व उरलेले द्रावण झाडाच्या बुंध्यालगत मुळाशी ओतावे.<br>• काजू बी तयार झालेली आहे. तयार झालेल्या बीयांची काढणी करुन ती उन्हामध्ये योग्यप्रकारे वाळवावी.<br>• विद्यापीठाने शिफारस केल्याप्रमाणे काजू बोंडापासून विविध टिकावू पदार्थ तयार करावेत. |
| नारळ/ सुपारी | –– | • सरासरी तापमानात वाढ झाल्यामुळे नारळाच्या बागेला ५ ते ६ दिवसांनी आणि सुपारी बागेला ४ ते ५ दिवसांच्या अंतराने पाणी दयावे.<br>• नारळावरील गेंडाभुंगा या किडीच्या नियंत्रणासाठी बागेमध्ये शेणखताच्या खड्डयात दर दोन महिन्यांनी मिथील पॅरॅथिऑन २ टक्के भुकटी मिसळावी.<br>• नारळावरील सोंडया भुंगा या किडीच्या नियंत्रणासाठी खोडावर १ मिटर उंचीवर गिरमिटाच्या सहाय्याने १५ ते २० सें.मी. खोल तिरपे भोक पाडून त्यामध्ये २० टक्के प्रवाही क्लोरोपायरीफॉस नरसळयाच्या सहाय्याने ओतावे आणि भोक सिमेंटच्या सहाय्याने बंद करावे. |
| भाजीपाला लागवड | | • भाजीपाला (वांगी, टोमॅटो, मिरची व नवलकोल) पिकांमध्ये भुरी रोगाच्या नियंत्रणासाठी ५ टक्के हेक्झाकोनझोल ५ मिली किंवा ८० टक्के पाण्यात मिसळणारी गंधक २० ग्रॅम प्रति १० लिटर पाण्यामध्ये मिसळून फवारावे.<br>• वेलवर्गीय भाजीपाला पिकामध्ये फळमाशीच्या नियंत्रणासाठी प्रति हेक्टर ४ रक्षक सापळे लावावेत. |
| दुभती जनावरे/ शेळया/ कुकुटपालन | – | • जनावराना पाणी पिण्यासाठी स्वच्छ पाण्याची व्यवस्था करावी तसेच गोठयामधे हवा खेळती राहिल याची काळजी घ्यावी.<br>• जनावरांना हिरव्या चाऱ्यासाठी झुडूपवर्गीय व बहुवर्षीय वैरणीच्या पिकांची लागवड करावी.<br>• दुभत्या जनावरांना १ ते १.५ किलो खुराक, १५ ते २० किलो हिरवी वैरण व ४ ते ५ किलो वाळलेली वैरणी द्यावी.<br>• सर्वसाधारण एका शेळीस ३–४ किलो हिरवा चारा, २ ते २.५ किलो वाळलेला चारा व ३०० ग्रॅम खुराक प्रतिदिन दयावा.<br>• जनावरांचे उष्णतेपासून योग्यते संरक्षण करावे. गोठयामध्ये व शेडमध्ये हवा खेळती राहिल याची काळजी घ्यावी.<br>• ब्रॉयलर पक्षांना पहिले तीन आठवडे त्यांच्या वजनानुसार ब्रॉयलर स्टार्टर व पुढे म्हणजेच चार–सहा आठवडयांपर्यंत ब्रॉयलर फीनीशर खाद्य द्यावे.<br>• दिवसाचे कमाल तापमान वाढत असल्याने कोंबडयांचे उष्णतेपासून संरक्षण करावे. |
| सुचना | – | • निरनिराळे किडी, रोग जास्त प्रमाणात आढळल्यास नजिकच्या कृषि विद्यापीठाचे केंद्र किंवा महाराष्ट्र शासनाचे कृषि अधिकारी यांच्याशी संपर्क साधावा. |